# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**(महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७ / (३२२/०७) विशि-४ महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ (१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम क्रमांक ६) व्दारा संचालीत राज्य विद्यापीठ)**

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग

एम.आय.डि.सी. रोड कॉम्प्लेक्स, गडचिरोली - ४४२६०५


जावक क्र./गों.वि.ग./क्री.शा.शि./ ७४४/२०२५ दिनांक : ३०/०१/२०२५

प्रति,

मा. कुलसचिव / संचालक, विद्यार्थी विकास विभाग / क्रीडा संचालक
सर्व अकृषी / कृषी / संस्कृत / आरोग्य विज्ञान / तंत्रशास्त्र / मुक्त व इतर विद्यापीठे

**विषय :- महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२४,**
**(क्रीडा महोत्सव वाढीव कालावधी बाबत सुचना.. कालावधी दि. १७ ते २२ फेब्रुवारी, २०२५)**

संदर्भ :- विद्यापीठ पथकासाठी सुचना पत्र क्र. क्री.शा.शि./६९७/२०२५, दि. २३/०१/२०२५

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, महामहिम राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्या कार्यालयाने २६ व्या महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ क्रीडा महोत्सव २०२४ आयोजनाची जबाबदारी गोंडवाना विद्यापीठाकडे सोपविली असून विद्यापीठ पथकांसाठी संदर्भीय पत्रान्वये सुचना करण्यात आलेल्या आहेत.

मा. राज्यपाल कार्यालयाव्दारे गठीत Oversee and Study the organization समितीने सुचविल्यानुसार क्रीडा महोत्सवामध्ये सहभागी होणाऱ्या पथकांसाठी खालीलप्रमाणे काही सुचना नव्याने करण्यात येत आहेत.

१) क्रीडा महोत्सवामध्ये खेळ प्रकारांची संख्या अधिक असल्याने पुर्वनियोजीत कालावधीमध्ये बदल करुन संघ व्यवस्थापकांची सभा दि. १८ फेब्रुवारी, २०२५ ऐवजी **दिनांक १७ फेब्रुवारी, २०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजता आयोजीत करण्यात येत आहे.** त्यानुसार सर्व संघ व्यवस्थापकांनी नोंद घेवून सभेला उपस्थित राहावे. संपुर्ण स्पर्धा ह्या दिनांक १८ फेब्रुवारी, २०२५ पासून सुरू होतील.

२) क्रीडा महोत्सव २०२४ चे समारोपीय कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी, २०२५ रोजी सायं. ५.०० वाजता आयोजीत होणार असून त्यादृष्टिने पथकांनी प्रवासाचे नियोजन करावे.

३) संदर्भीय सुचनेनुसार कबड्डी व चेस या स्पर्धा गडचिरोली येथे आयोजीत करण्यात येणार असल्याचे कळविण्यात आलेले होते. तथापी रेल्वे सुविधेचा विचार करुन ॲथलेटिक्स, बास्केटबॉल, व्हॉलीबॉल, खो-खो, टेबल टेनिस, बॅडमिंटन, कबड्डी व चेस ह्या मुला व मुलींच्या **संपुर्ण स्पर्धा चंद्रपूर व बल्लारपूर येथे आयोजीत करण्यात येत आहेत.** याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

४) ज्या विद्यापीठांनी अद्यापही क्रीडा महोत्सव २०२४ करीता प्रो-रेटा पाठविलेला नाही त्यांनी यथाशिघ्र प्रो-रेटा पाठवावे.

GONDWANA UNIVERSITY Physical Education Department GADCHIROLI (M.S.)

**डॉ. अनिता लोखंडे**
संचालक, क्रीडा व शा. शिक्षण विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

Director
Department of Sports & Physical Education Gondwana University Gadchiroli

प्रतिलिपी माहितीस्तव -

१) मा. कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
२) मा. प्र-कुलगुरू महोदय, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली
३) मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली